# एक दिवसीय कार्यशाळा

# अध्ययन अक्षमता

कुळगांव बदलापूर नगरपरिषद आणि आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगाव बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. ११-०२-२०१३ रोजी अध्ययन अक्षमता या विषयासंदर्भात एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेत जाणाऱ्या मुलामुलींपैकी जवळजवळ ०७% विद्यार्थ्यांना ही समस्या असू शकते ज्याचा त्यांच्या भावनिक, शालेय व सामाजिक विकासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. या संदर्भातील जाणीव ,जागृती निर्माण व्हावी व त्या संदर्भातील इतर माहिती सर्वांना, विशेषतः शिक्षक वर्गाला मिळावी म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कुळगांव बदलापूर व परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयातून ५० शिक्षकांनी या कार्यशाळेत सक्रीय सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल मेने व कार्यशाळेसाठी तज्ज्ञ म्हणून मा.सौ. मीना शिलेदार व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. वैदेही दप्तरदार उपस्थित होत्या. सर्वप्रथम सुनिल मेने व सौ. शिलेदार मॅडम यांचे प्राचार्यांनी स्वागत केले. दीपप्रज्वलन व ईशस्तवनानंतर श्री. सुनिल मेने यांनी आपल्या मार्गदर्शनात असे म्हटले की मुलांचे मन शाळेत रमवण्याची जबाबदारी शिक्षकांची असून विशिष्ट गरजा असणाऱ्या मुलांवर आपला किमान एक तास अधिकचा देण्याचा प्रयत्न केल्यास या मुलांना त्याचा निश्चितच फायदा होईल असे आवाहन केले. त्यानंतर मा. प्राचार्या वैदेही दप्तरदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व विशिष्ट गरजा असणाऱ्या मुलांसाठी शासन वेळोवेळी परिपत्रके काढते परंतु त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे, त्या संदर्भात जागृती करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा आयोजित करण्याची आवश्यकता असल्याचे व तरच सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो असे प्रतिपादन केले. त्यानंतर त्यांनी कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या सौ. मीना शिलेदार (मानसशास्त्रज्ञ व अध्ययन अक्षमता-तज्ज्ञ) यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. निवेदिता शेटे यांनी केले.

यानंतर मा.सौ. मीना शिलेदार यांचे मार्गदर्शनपर असे प्रदीर्घ व्याख्यान झाले. सध्याच्या काळात विभक्त कुटुंबपध्दती, प्रसारमाध्यमांचा पगडा, संगणक व मोबाईलचा वाढता वापर यामुळे मुलांचा पालकांशी संवाद कमी झाला आहे. परिणामी मुलांच्या समस्या चटकन लक्षात येत नाहीत सर्वत्र एकप्रकारची स्पर्धात्मक परिस्थिती असून पालक स्वतःच बरेचदा तणावग्रस्त असतात त्यामुळे त्यांचे ताणतणाव व नकारात्मक भावना मुलांवर संक्रमित होताना दिसतात असे त्यांनी प्रतिपादन केले.

त्यानंतर त्यांनी अध्ययन अक्षमता ही एक समस्या आहे, आजार किंवा अपंगत्व नसून केवळ अध्ययन करण्याच्या संबंधातील क्षमता किंवा कुवत यातील कमतरता असल्याचे व त्यासाठी या मुलांना विशिष्ट प्रकारे शिक्षण देणे गरजेचे असल्याचे सांगितले.

अध्ययन अक्षमतेचे निदान करण्याच्या पायऱ्या कोणकोणत्या आहेत व कोणत्या केंद्रावर या निदान चाचण्या केल्या जातात त्याविषयी संपूर्ण व सविस्तर माहिती दिली. या विशिष्ट समस्येमुळे या मुलांना कशाप्रकारे वेगवेगळ्या अडचणींना तोंड द्यावे लागते व त्या सोडवण्यासाठी शिक्षक व पालकांनी कसे एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे हे ही प्रतिपादन केले.

तसेच अध्ययन अक्षमता असणाऱ्या मुलांना शासनाकडून विविध परिपत्रके काढून अनेक सवलती दिलेल्या आहेत याचीही त्यांनी माहिती दिली. भोजनानंतरच्या सत्रात शिक्षकांनी विविध प्रकारे भूमिका निर्वाहन करुन मनमोकळा संवाद साधला. तसेच प्रा.सौ.सुचिता नाईक व सौ. टोकेकर मॅडम यांनीही उपस्थितांशी संवाद साधला. सर्व उपस्थितांनी कार्यशाळा खूपच उपयुक्त ठरल्याचे सांगितले व आयोजकांना धन्यवाद दिले. मा. प्राचार्यांनी अशा कार्यशाळांचे नक्कीच आयोजन करु असे आश्वासनही दिले.

**- प्राचार्या वैदेही दप्तरदार**

❖❖